अतारांकित प्रश्नोत्तरांची १४ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सांगली, सातारा व पुणे या जिल्हयात होत असलेल्या घरफोडयांबाबत

(१) १७ (२६-०४-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शंकर मांडेकर (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, सातारा व पुणे जिल्हयात सन २०२४ मध्ये मोठया प्रमाणात घरफोडया झाल्याच्या घटना घडल्या असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर जिल्ह्यात सुमारे १ हजारांहून अधिक घरफोड्या झाल्या असून १९०० वाहनांच्या चोरीची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा व तालुकानिहाय माहे सन २०२४ मध्ये घरफोडीच्या किती घटना घडल्या आहेत व त्यानुषंगाने किती गुन्हे उघडकीस आले आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२५) : (१) अंशत: खरे आहे,

सन २०२४ मध्ये घरफोडीच्या घटना घडल्या असनु त्यानुषंगाने सांगली जिल्ह्यात ३३१ गुन्हे, सातारा जिल्ह्यात ३०० गुन्हे तर पुणे जिल्ह्यात पुणे(शहर) घटकामध्ये ५१२ व पुणे(ग्रामीण) घटकामध्ये ६२९ असे एकत्रित ११४१ गुन्हे दाखल आहेत.

परंतु उक्त घटकांमध्ये वेळोवेळी राबविलेली कोम्बिंग ऑपरेशन्स, नाकाबंदी, रेकॉर्डवरील आरोपी चेकिंग, बीट मार्शल पेट्रोलिंग सिस्टिम, सक्त रात्रगस्त यामुळे घरफोडीचे गुन्हे सन २०२३ च्या तुलनेत कमी होण्यास मदत झाली आहे. गुन्हे वाढु नयेत म्हणुन रात्रगस्त, पेट्रोलिंग द्वारे करडी नजर ठेवुन प्रतिबंध करण्यात येत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भितीचे वातावरण नाही.

(२) होय, हे खरे आहे,

नागपुर जिल्ह्यात घरफोडी घटनांबाबत नागपुर(शहर) घटकामध्ये १०१३ व नागपुर(ग्रामीण) घटकामध्ये २९८ गुन्हे दाखल असुन वाहनांच्या चोरीबाबत नागपुर (शहर) घटकामध्ये १९४७ व नागपुर (ग्रामीण) घटकामध्ये ३९३ गुन्हे दाखल आहेत.

(३) सन २०२४ मध्ये जिल्हा व तालुकानिहाय घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे व उघडकीस आलेले गुन्हे पुढील प्रमाणे-

१. नागपुर ग्रामीण

अ.क्र	नागपुर ग्रामीण घटकातील तालुके/उपविभाग	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	नागपुर उपविभाग	३०	६
२	काटोल उपविभाग	५४	२४
३	सावनेर उपविभाग	८१	२१
४	कन्हान उपविभाग	५५	२९

५	रामटेक उपविभाग	३०	७
६	उमरेड उपविभाग	४८	१८
	एकूण	२९८	१०५

२. नागपुर शहर

अ.क्र	नागपुर शहर घटक	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	नागपुर शहर	१०१३	३१८

३. पुणे ग्रामीण

अ.क्र	पुणे ग्रामीण घटकातील तालुके/उपविभाग	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	बारामती	८१	२०
२	इंदापुर	६२	०६
३	दौंड	८४	२१
४	पुरंदर	४५	०३
५	भोर	२८	०५
६	शिरुर	९८	२४
७	हवेली	२७	०३
८	वेल्हा	०२	०१
९	मुळशी	२९	०१
१०	मावळ	६७	०७
११	खेड	१९	०४
१२	आंबेगाव	३०	०९
१३	जुन्नर	५७	१०
	एकुण	६२९	११४

४. पुणे शहर

अ.क्र	पुणे शहर घटक	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	पुणे शहर	५१२	१८४

५. सातारा

अ.क्र	सातारा जिल्हा घटकातील तालुके/उपविभाग	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	सातारा	८६	२४
२	कोरेगाव	२९	१०
३	वाई	२१	११

४	कराड	६१	१८
५	पाटण	८	५
६	फलटण	५७	१२
७	दहिवडी	३८	८
	एकुण	३००	८८

६. सांगली

अ.क्र	सांगली जिल्हा घटक	घरफोडीच्या घटनांबाबत दाखल गुन्हे	उघडकीस आलेले गुन्हे
१	सांगली	३३१	९७

(४) तपासादरम्यान उघडकीस आलेल्या गुन्ह्यांमध्ये निष्पन्न झालेल्या आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असुन तपास पुर्ण झालेल्या आरोपींविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच तपास चालू असलेल्या प्रकरणात तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

धनगर समाजाच्या कल्याणासाठी सुधाकर शिंदे अभ्यासगटाच्या अहवालातील शिफारशींची शासनाने अमंलबजावणी करणेबाबत

(२) १०९ (०८-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती-जमाती व महिलांसाठी जशी स्वतंत्र आर्थिक तरतुद केली जाते तशी तरतुद धनगर समाजासाठी करण्यात यावी, अशी शिफारस सुधाकर शिंदे अभ्यासगटाने राज्य शासनाला सादर केलेल्या अहवालाद्वारे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुधाकर शिंदे अभ्यासगटाने शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शिफारशींच्या अमंलबजावणी करिता कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (०३-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण/लाभ देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने मध्यप्रदेश, बिहार व तेलंगणा या राज्यांनी त्यांच्या अधिकारामध्ये त्या राज्यातील जातनिहाय यादीमध्ये समावेश असलेल्या काही जाती/ जमातींना अनुसूचित जमाती प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र तसेच अन्य लाभ देण्याबाबत अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दि.२०.११.२०२३ अन्वये डॉ.सुधाकर शिंदे (भारतीय राजस्व सेवा) यांचे अध्यक्षतेखाली शिष्टमंडळ /अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.

सदर शिष्टमंडळ/ अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालातील बाबी कायदेशीरदृष्ट्या तपासून त्यानुषंगाने कायदेशीर मत देण्याबाबतची कार्यवाही विधी व न्याय विभागामार्फत सुरु आहे.

राज्य परिवहन कार्यालयात सह परिवहन आयुक्तांच्या पदात अनियमितता झाल्याबाबत

(३) २७० (०८-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयात मागील तीन वर्षापासून सह परिवहन आयुक्त पद रिक्त असताना परिवहन आयुक्तांनी शासनाची मंजूरी न घेता सह परिवहन आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन आयुक्त यांनी दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२४ रोजी शासनाला पाठविलेल्या रिक्त पदांची नावे व १२ नोव्हेंबरचा पारित केलेल्या आदेशात अधिकाऱ्यांच्या नावामध्ये बदल असल्याची माहिती समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सह परिवहन आयुक्त उमेदवारांना न्याय मिळविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रताप सरनाईक (१०-०७-२०२५) : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) परिवहन आयुक्त कार्यालयातील अपर परिवहन आयुक्त ते प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील एकूण मंजूर १७ पदांपैकी १४ पदे रिक्त असल्याने या रिक्त पदांचा कार्यभार सोपविण्याचा प्रस्ताव परिवहन आयुक्त यांनी दि.०५.११.२०२४ च्या अर्धशासकीय पत्रान्वये शासनास सादर केला आहे. तसेच परिवहन आयुक्त कार्यालयातील अधिकारी वर्गाची कमतरता व कामकाजाची निकड विचारात घेऊन शासनस्तरावरुन आदेश निर्गमित होईपर्यंत परिवहन आयुक्त कार्यालयाचे आदेश दि.१२.११.२०२४ अन्वये परिवहन आयुक्त कार्यालयात रिक्त असलेल्या पदांचे अतिरिक्त कार्यभार मुंबई महानगर प्रदेशातील कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे सोपविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

महाबळेश्वर (जि.सातारा) येथील किल्ले प्रतापगडाच्या संवर्धनाबाबत

(४) २८४ (२६-०४-२०२५). श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर (जि.सातारा) येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा सांगणाऱ्या किल्ले प्रतापगडाची संवर्धन कामे गुणवत्ता व दर्जेदार करा असे निदेश मा.पर्यटन मंत्री यांनी दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ले प्रतापगडाच्या संवर्धनाबाबत कृती आराखडा व निधीची तरतूद करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१७-०७-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

नियोजन विभागाने दिनांक ०५/०३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार सातारा जिल्हयातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटन स्थळे विकासाचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत रु.३८१.५६ कोटी रक्कमेच्या आराखडयास मंजुरी दिलेली आहे. यामध्ये प्रतापगड किल्ला जतन व संवर्धनासाठी रु. १२७.१५ कोटी इतका निधी मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या, दिनांक १९/०७/२०२४ च्या

शासन निर्णयान्वये प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. तसेच, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०६/०२/२०२३ अन्वये प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराज सृष्टी निर्माण करणे ही कामे २ टप्प्यात करण्याकरीता एकूण १०.०० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

देवीभोयरे (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री प्रकरणाबाबत

(५) ४०३ (२६-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवीभोयरे (ता.पारनेर, जि.अहिल्यानगर) येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री प्रकरणात क्रांती शुगर या खासगी कंपनीचे ९ संचालक व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे २ वरिष्ठ अधिकारी यांच्याविरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वाकरण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पारनेर यांच्या जा. क्र. २१८/२०२५ दि. १४.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये पारनेर पोलीस ठाणे, जि.अहिल्यानगर येथे गु.र.क्र. ४०/२०२५, भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने श्री.क्रांती शुगर ॲण्ड पॉवर लिमिटेड, देवीभोयरे, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर यांच्यातर्फे प्रशासकीय अधिकारी यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे दाखल केलेल्या Exh-५ IN CRIMINAL REVISION APPLICATIONS NO. ०७/२०२५ AND ०३/२०२५ मध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये मा.न्यायालयाचे पुढील आदेश होई पर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गडचिरोली जिल्हा व अन्य भागातील नक्षलवाद मोडून काढण्याबाबत..

(६) ४१४ (२६-०४-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात तब्बल ३८ वर्षे नक्षल चळवळीत राहून सदस्य ते दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य इ. विविध पदावर राहून या शिवाय ६६ गुन्हे दाखल असणाऱ्या जहाल महिला माओवादी नेता व केंद्रीय समिती सदस्य भूपती यांच्या पत्नीसह अकरा जणांनी दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी शस्त्र खाली ठेऊन संविधान हाती घेऊन सन्मानाने जगण्याचा मार्ग स्वीकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या भुमिकेचे व त्या भागात अन्य विकास कामे करण्यामुळे नक्षलवाद पूर्णत: संपला असल्याचे निदर्शनास येत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने गडचिरोली जिल्हा व अन्य भागातील नक्षलवाद मोडीत काढण्याबाबत अन्य कोणकोणती कामे करण्याचे योजिले आहे व त्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) नक्षलवाद मोडीत काढण्यासाठी गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दल, विशेष अभियान पथक, विशेष कृती दल, एसआरपीएफ, सीआरपीएफ आणि जॉईन टास्क फोर्स मार्फत नक्षल प्रभावित भागांमध्ये नक्षल विरोधी अभियान पूर्ण क्षमतेने राबविले जात आहेत.

नक्षल प्रभावित भागांमध्ये रस्त्यांचा विकास, पूल बांधणी करुन जाळे निर्माण करणे, नविन पोलीस ठाणे, पोलीस मदत केंद्र सुरु करुन विविध कल्याणकारी शासकीय योजना अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दल नागरी कृती शाखेच्या माध्यमातून प्रभावी काम करीत आहेत.

गडचिरोली व गोंदिया जिल्हयात नवीन व्यवसाय, उद्योगधंदे, खाण उघडण्यात आलेले असून त्यातून स्थानिकांना प्राधान्य देवून रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

दुर्गम भागात मोबाईल टॉवर उभारणीस मदत करुन दुर्गम भागांना मोबाईल कनेक्टीविटीद्वारे जोडले जात आहे. गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दलाने आत्मसमर्पण योजना प्रभावीपणे राबवून अत्यंत जहाल माओवाद्यांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले आहे. आत्मसमर्पण केल्यानंतर आत्मसमर्पित माओवाद्यांना राहण्यासाठी हक्काचे घर व भुखंड मिळावे याकरिता महसूल विभागास पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला जातो. भुखंड मिळाल्यानंतर जिल्हा परीषद तसेच पंचायत समिती येथे पत्रव्यवहार करुन आत्मसमर्पित माओवाद्यांना घरकुलासाठी पाठपुरावा करण्यात येतो. त्यांनतर आत्मसमर्पित माओवाद्यांनी उदरनिर्वाहासाठी स्वयंरोजगार उभा करुन त्यांचे जिवनमान उंचविण्यासाठी नागरी कृती शाखेद्वारे त्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

सन २०२२ पासुन ४ वर्षांमध्ये गडचिरोली जिल्हयात ५९४ मोबाईल टॉवर मंजुर असुन त्यापैकी ५०२ मोवाईल टॉवरचे काम पूर्ण झाले आहे व ७४ मोबाईल टॉवरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच गोंदिया घटकात मंजूर असलेल्या ३३ टॉवरचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

गडचिरोली घटकात फेज-१, फेज-२, व फेज-४ अंतर्गत २६ रोड मंजूर असुन त्यापैकी १९ रोडचे बांधकाम पूर्ण झालेले आहे व ८ पुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच गोंदिया घटकात ०२ रोड मंजूर असून बांधकाम पूर्ण झालेले आहे.

गडचिरोली पोलीस दलामार्फत राबविण्यात येणा-या पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातुन आजपर्यंत नक्षलग्रस्त संवेदनशिल भागातील १० लक्ष तसेच गोंदिया पोलीस दलामार्फत ०२ लक्ष सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळवून देण्यात आलेले आहेत.

राज्यात सर्वांगिण प्रगतीसाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करण्याबाबत

(७) ६३९ (२६-०४-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वांगिण प्रगतीसाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करुन ठोस कामगिरी करण्याचे निदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सर्व विभागांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने दि १३ जानेवारी,२०२५ रोजी सहयाद्री अतिथीगृहात सार्व.बांधकाम, शालेय शिक्षण, पर्यटन, इत्यादि विभागांच्या मंत्री, राज्यमंत्री, आयुक्त संचालक यांची मा.मुख्यमंत्री यांचेबरोबर झालेल्या बैठकीनुसार कोणकोणत्या विभागांनी कृती आराखडा तयार केला व त्या आराखड्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कृती आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०२५) : (१) दि.०९/१२/२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी सर्व प्रशासनिक विभागांच्या सचिवांसोबत बैठक घेऊन राज्य प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक व्हावे यादृष्टीने विवक्षित निदेश दिले. त्यांमध्ये सर्व विभागांनी १०० दिवसांच्या कामगिरीचा अहवाल सादर करावा याचा देखील समावेश आहे.
(२) व (३) सर्व संबंधित प्रशासनिक विभाग/विभागांचे भाग यांनी दि.२४/१२/२०२४ ते दि.१३/०१/२०२५ या कालावधीत आपापल्या १०० दिवस कृती आराखड्यांचे सादरीकरण केले. उक्त आराखडे कालमर्यादित कार्यक्रमाच्या स्वरूपात होते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवालातील शिफारशीसंदर्भात

(८) ६७३ (०८-०४-२०२५). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवालाचे प्रकाशन मुंबईत दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील मुख्य शिफारशीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिफारशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०२५) : (१) महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवाल २०२४ याचे दि. २६.१२.२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे प्रकाशन करण्यात आले.
(२) महाराष्ट्र जिल्हा सुशासन निर्देशांक अहवाल २०२४ यामध्ये १० विकास क्षेत्रांवर आधारित १६१ निर्देशांकांचा समावेश आहे. उक्त अहवालात शिफारशी करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

(९) ७३४ (२६-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि. रायगड) हे कोकणातील दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ असून येथे मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याने पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणच्या सुंदर स्वच्छ समुद्र किनारे, नारळी पोफळीच्या बागा पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत असून सोळाव्या शतकात बांधलेले हरिहरेश्वरचे प्राचीन मंदिर या टेकड्या लगत असल्याने या मंदिरात व मंदिर परिसरात केलेल्या कामाची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन हरिहरेश्वर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी कोणत्या उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१७-०७-२०२५) : (१) (२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

हरिहरेश्वर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथे रस्त्यासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत रु.५०.०० लक्ष व सन २०२४-२५ अंतर्गत रु.१५.०० लक्ष इतक्या रकमेची कामे मंजूर करण्यात आली आहेत. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/०१/२०२२ अन्वये हरिहरेश्वर येथे सभामंडप, बैठक व्यवस्था, सेल्फी पॉईट तयार करणे, या कामास रु. २१७.०० लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नागरिकांचे फसव्या योजना व गुंतवणुकींमध्ये नुकसान होत असल्याने आर्थिक गोपनिय कक्ष सुरू करण्याबाबत.

(१०) ८३५ (२५-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेअर मार्केट व इतर योजनाद्वारे अवास्तव व्याज परतावा देण्याचे आमिष दाखवून नागरीकांकडून करोडो रुपयांची गुंतवणूक करुन घेवून फसवणूक होत असल्याचे सातत्याने निदर्शनास येत आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फसव्या योजनांना आवर घालण्यासाठी गुन्हे शाखेच्या अखत्यारित येणारा आर्थिक गोपनिय कक्ष २०२० मध्ये बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यातील नागरिकांचे फसव्या योजना व गुंतवणुकींमध्ये करोडो रुपयांचे नुकसान होत असल्याने सदरहू आर्थिक गोपनिय कक्ष सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०९-२०२५) : (१) होय. तथापि सदर फसवणूकीच्या घटनांना आळा बसावा याकरिता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत:-

(१) लोकांना फसविण्याऱ्या योजनांना आवर घालण्यासाठी दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या स्थायी आदेशाद्वारे Economic Intelligence Unit स्थापन करण्यात आले आहे.

(२) जिल्हा/ शहर स्तरावर संबंधीत पोलीस घटक कार्यालयात आर्थिक गोपनिय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) राज्यात सर्व प्रकारच्या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी एकुण ५१ सायबर लॅब्स तसेच ५० सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित आल्या आहेत.

(४) पोलीस अधिकारी, प्रशासकीय सेवेतील अधिकारी, न्यायपालिकेतील अधिकारी, न्यायसहायक क्षेत्रातील अधिकारी यांना सायबर गुन्ह्यांबाबत आधुनिक पद्धतीचे अन्वेषण आणि तपासाचे प्रशिक्षण देण्याचे धोरण निश्चीत करण्यात आले असून त्याअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येते.

(५) सामान्य नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी अशा सर्व विविध स्तरापासून ते सामान्य लोकांपर्यंत जनजागृती केली जात आहे. तसेच, सोशल मिडीयाद्वारे इंटरनेट माध्यमाद्वारे सर्व सामान्य नागरीकांना गुन्ह्यांच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जात आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्या दिनांक ०७.१२.२०२० च्या परिपत्रकान्वये, कार्यरत

असलेल्या कक्ष-९ (गोपनीय कक्ष) कडे तपासाकरीता असलेले सर्व गुन्हे हे जनरल चिटींग स्वरुपाचे असल्याने सदर कक्षाच्या कामात सुसूत्रता रहावी आणि प्रलंबित गुन्ह्यांचा निपटारा विहीत वेळेत करता यावा या उद्देशाने सदर कक्षातील सर्व गुन्हे, प्राथमिक चौकशा आणि सर्व मनुष्यबळ (पोलीस अधिकारी आणि अंमलदार) हे जनरल चिटींग विभागांतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कक्ष-६ (जनरल चिटींग-४) या कक्षात वर्ग करण्यात आले आहे. यापुढे कक्ष-९ (गोपनीय कक्ष) यास गोपनीय आणि तांत्रिक विश्लेषण कक्ष या नावाने संबोधण्यात येत आहे.
(३) लोकांना फसविण्याच्या योजनांना आवर घालण्यासाठी दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या स्थायी आदेशाद्वारे Economic Intelligence Unit स्थापन करण्यात आले आहे. तसेच, दिनांक ०५.०५.२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये E.I.U. मध्ये अधिकारी आणि अंमलदार यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भोकरदन (जि.जालना) येथील शेतकऱ्यांच्या गोठ्यातील बैल चोरीला गेल्याबाबत

(११) १२०५ (२६-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) येथील श्री.कृष्णा लोखंडे, राहणार लिंगेवाडी, श्री.विष्णू रंगनाथ सहाने, राहणार, सोयगाव व श्री.संतोष त्रिंबक सहाने यांच्या शेतामधील गोठ्यातील अनुक्रमे दोन-दोन-एक असे एकूण रुपये पाच लाख इतक्या किंमतीचे पाच बैल माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान चोरीला गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी अज्ञात चोरट्यांनी बैल चोरुन नेल्याप्रकरणी भोकरदन, हसनाबाद व पारध या तिन्ही पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, स्थानिक बैल मालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित बैल चोरांना पकडण्यासाठी तसेच अशा स्वरूपाच्या चोरीच्या घटना रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
मौजे सोयगाव देवी व लिगेंवाडी, ता-भोकरदन जिल्हा-जालना या ठिकाणी दि.१८.०९.२०२४ रोजी सदर बैल चोरीची घटना घडली आहे.
(२) अंशत: खरे आहे,
भोकरदन पोलीस ठाणे येथे गु.र.नं ४२६/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन हसनाबाद व पारध या ठिकाणी याबाबत गुन्हा नोंद नाही.

तसेच सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपीतांचा मा. न्यायालयाकडून पि.सी.आर घेण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे. यामुळे बैल मालकांमध्ये चिंतेचे वातावरण नाही.
(३) सदर गुन्ह्यात दोन निष्पण आरोपींना अटक करण्यात आली असुन अशा स्वरुपाच्या चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलीस घटकाकडुन प्रभावीपणे पेट्रोलिंग, रात्रगस्त, नाकाबंदी, गावामध्ये जनजागृती करण्यात येत आहे. पेट्रोलिंग दरम्यान शेतवस्तीवरील शेतकऱ्यांना जनावरे रस्त्यालगत बांधु नये अशा सुचना देण्यात येत आहे.
तसेच बीट अधिकारी, बीट अंमलदार यांच्या मार्फत मुख्य रस्त्यांवर नाकाबंदी करुन जनावरे चोरीस आळा घालण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था रोखण्याबाबत

(१२) १३४७ (२६-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धार्मिक दंगली वाढल्या असून सन २०२४ मध्ये १२ दंगलींची नोंद करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ दरम्यान निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(२) असल्यास त्यामुळे राज्यात जातीय सलोखा बिघडला असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास या संदर्भात शासनाने माहिती घेऊन राज्यात धार्मिक दंगली घडू नयेत याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) : (१) होय हे अंशत: खरे आहे.

सन २०२४ मध्ये राज्यात एकुण २२ धार्मिक तसेच जातीय दंगली घडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सदर घटनांची पोलीसांनी तात्काळ दखल घेऊन परिस्थिती आटोक्यात आणली व जातीय सलोखा बिघडू दिला नाही.

राज्यात धार्मिक दंगली घडू नयेत म्हणून पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रमाणित कार्यपद्धतीबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना सदर परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत तसेच शांतता समिती, मोहल्ला कमिटी यांच्या वेळोवेळी बैठका घेऊन शांतता राखण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच सन २०२४ मध्ये घडलेल्या दंगलीच्या अनुषंगाने घटकस्तरावर अज्ञात तसेच निष्पन्न आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, निष्पन्न आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच धार्मिक व जातीय दंगली घडू नयेत म्हणून जातीय सलोखा, मोहल्ला कमिटी, शांतता समिती, पोलीस मित्र समिती, झोपडपट्टी पोलीस पंचायत समिती व दंगल काबू योजना इत्यादी प्रकारच्या योजना घटकस्तरावर अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतात. तसेच पोलीस ठाणे मार्फत पायी पेट्रोलिंग, बिट मार्शल पेट्रोलिंग, मोबाईल पेट्रोलिंग वारंवार करण्यात येउन संमिश्र वस्त्यांमध्ये वेळोवेळी भेट देण्यात आली आहे.

भोकरदन (जि.सातारा) तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीमधील इमारतींचे पुनर्निर्माण, दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत

(१३) १३७२ (२६-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.सातारा) तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वसाहतीमधील इमारतींची दूरवस्था झाली असून त्या मोडकळीस आलेल्या आहेत त्या कधीही कोसळून वित्त वा जीवितहानी होण्याची भिती निर्माण झाली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे वसाहतीतील सांडपाणी वाहून नेणारे पाईप, गटार लाईन, डब्लूसी चेंबर्स, छोटे नाले नादुरुस्त असल्याने रहिवाशांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतींचे पुनर्निर्माण, दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२५) : (१) व (२) होय.
(३) भोकरदन पोलीस ठाणे, जि. जालना येथील पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे करिता ६६ शासकीय निवासस्थानांचे बांधकाम महाराष्ट्र राज्य, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून हाती घेण्यात आले आहे. महामंडळाकडून मेसर्स सी.जी. असोसिएट्स, जालना यांची नियुक्ती करण्यात आली असून बांधकाम नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यसेवा परिक्षा २०२४ च्या जागांमध्ये वाढ करण्याबाबत

(१४) १८५७ (२५-०४-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यसेवा परिक्षेत सन २०२५ पासून बदल होणार असून ती वर्णनात्मक पध्दतीने होणार आहे, त्यामुळे जुन्या पध्दतीने परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी ही शेवटची संधी असल्याने विद्यार्थी हिताचा विचार करता मुख्य परिक्षेपूर्वी राज्यसेवा २०२४ च्या जागांमध्ये वाढ करावी अशी मागणी स्टुडंट राईटस असोशियन ऑफ इंडियाच्या वतीने शासनास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करुन राज्यसेवा जागांमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०२५) : (१) राज्यसेवा परिक्षेत सन २०२५ पासून बदल होणार असून ती वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे.
तथापि, स्टुडंट राईटस असोशियन ऑफ इंडियाच्या वतीने राज्यसेवा परीक्षा २०२४ च्या जागांमध्ये वाढ करण्याबाबत मागणी शासनास प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवतनाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे शिक्रापूर (ता.शिरूर, जि.पुणे) येथील अपघातग्रस्तांच्या वारसांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

(१५) २००८ (२६-०४-२०२५). श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिक्रापूर (ता.शिरूर, जि.पुणे) येथील चाकण-शिक्रापूर रस्त्यावर भरघाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार वडील व दोन शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पिंपळे-जगताप येथे घडल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रक चालकाविरोधात शासनाने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबियांच्या वारसांना शासनाने आर्थिक मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
दि.०६.०१.२०२५ रोजी चाकण-शिक्रापूर रोडवर पिंपळे जगताप फाटयाजवळ मोटार सायकलला टेम्पो या वाहनाने जोरदार धडक दिल्याने अपघातामध्ये दुचाकीस्वार व त्यांची दोन मुले यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन शिक्रापूर पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण येथे गु.र.नं. ०९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०५ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये टेम्पो चालकाविरुध्द दिनांक ०६.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यासंदर्भात दोषारोपपत्र दिनांक १७/०३/२०२५ रोजी दाखल करण्यात आले असुन त्याचा आरसीसी नंबर १६६/२०२५ असा आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपी सध्या जामीनावर आहेत.
(३) अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबियांचे वारसदार श्रीमती शिल्पा गणेश खेडकर यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत रु.२,००,०००/- (दोन लाख) ची आर्थिक मदत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयातील होडगी रोड विमानतळ परिसराला लागून असलेल्या घरांचे पुनर्वसन करण्याबाबत

(१६) २१८९ (२५-०४-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर नाईट लँडिंगसाठी होडगी रोड विमानतळ परिसराला लागून असलेली नागरी वसाहत अडचणीची ठरत असल्याचे कारण देत भारतीय विमानतळ प्राधिकरणाने ३०० घरांचे अतिक्रमण हटवण्याची सूचना होडगी रोड विमानतळ प्रशासनाला केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रथम डे लँडिंगची सर्व तयारी झालेली असताना डे लँडिंग सुरु न करता नाईट लँडिंगची तयारी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डे लँडिंगची सुरुवात करून बाधित घरांचे पुनर्वसन करूनच अतिक्रमण हटवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०२५) : (१) हे अशंत: खरे आहे.
सोलापूर (होडगी)विमानतळाच्या अंदाजे ४० एकर जमीनीवर अतिक्रमण झाल्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी कळविले आहे. सदर अतिक्रमण केलेल्या जागेमध्ये अंदाजे ३०० घराचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सोलापूर (होडगी) विमानतळ येथून डे लँडिगची सेवा सुरू करण्यात आली असून जमीनीवरील अतिक्रमण काढणेबाबत कार्यवाही सुरू असताना विविध पक्षकारांनी दिवाणी न्यायालय, सोलापूर व उच्च न्यायालयामध्ये पिटीशन दाखल केल्या आहेत. यापैकी गट नं.७१/१ व ७१/२ मौजे-मजरेवाडी येथील प्रकरणामध्ये दिवाणी न्यायालय, सोलापूर यांनी दि.३०.११.२०१९ रोजी अंतरीम स्थगिती आदेश दिलेले आहेत. तत्कालीन मा. मुख्य सचिव यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मा. न्यायालयामध्ये विमानतळ प्राधिकरणाकडून स्थगिती आदेश उठविणे संदर्भात अर्ज दाखल करणेची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील शस्त्रपरवाना धारकांचे शस्त्र परवाने रद्द करण्याबाबत

(१७) २३४५ (२५-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील एकुण शस्त्रपरवाना धारकांपैकी २४५ व्यक्तीं विरोधात गुन्हे दाखल असल्यामुळे त्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०८-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी बीड जिल्हयातील एकुण शस्त्र परवाना धारकांपैकी २३२ शस्त्र परवानाधारकांविरूद्ध गुन्हे दाखल असल्यामुळे त्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजी पत्र दिले आहे.

(२) व (३)

बीड जिल्ह्यातील ज्या शस्त्र परवानाधारकांविरूद्ध् गुन्हे दाखल आहेत त्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्याबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांनी दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजी पत्र दिल्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर पत्राच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करून १९९ शस्त्र परवानाधारकांचे शस्त्र परवाने रद्द केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

लोणार (जि.बुलढाणा) सरोवराच्या तीर्थक्षेत्र-पर्यटन विकास आराखड्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याबाबत

(१८) २४५९ (०८-०४-२०२५). श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवर (जि.बुलढाणा) हे ऐतिहासिक व जागतिक दर्जाचे नैसर्गिक ठिकाण असल्यामुळे येथे जगभरातून असंख्य पर्यटक व भाविक येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सरोवराचा तीर्थक्षेत्र-पर्यटनाचा विकास आराखडा मा.उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या समितीमार्फत तयार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१४-०७-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या आदेशान्वये विभागीय आयुक्त अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली लोणार सरोवर विकास समिती दि.२४.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आले. या समिती मध्ये शासकीय सदस्यासोबत अशासकीय सदस्य, शासकीय अधिवक्ता आणि ज्येष्ठ वकीलांचा समावेश करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे.

अध्यक्ष, लोणार सरोवर विकास समिती यांना आराखडयातील सर्व कामाकरिता प्रशासकीय मान्यता देणे, निविदा मंजूर करणे, निधीची विनियोग आणि कामांच्या अंमलबजावणीबाबत पूर्ण अधिकार देण्यात आलेले आहेत.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये महसूल व वन विभागाच्या दि.२४.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पायाभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत

(१९) २५७६ (२७-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी श्री.मुकुंदराज स्वामी संस्थान व श्री.योगेश्वरी देवस्थान येथे १००० लक्ष एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन सदर कामासाठी ५०० लक्ष एवढा निधी सन २०२२-२३ मध्ये वितरीत करण्यास मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी वेळेवर वितरीत न केल्याने व्यपगत झालेला निधी सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. पर्यटन मंत्री महोदयांकडून दिनांक १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निधी उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. शंभूराज देसाई (१४-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या क्र.टिडीएस २०२३/१०/प्र.क्र.३४३ (भाग-३)/पर्यटन-१, दिनांक १८ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत दि. ३१/०३/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला परंतु कोषगारातून आहरित न झालेला निधी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोपरगांव (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील समृध्दी महामार्गावर वारंवार अपघात घडुन अनेकांना आपला जीव गमवावा लागल्याबाबत

(२०) ३३०७ (२९-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगांव (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील हद्दीत समृध्दी महामार्गाचे ३० किलोमीटर अंतर असुन मुंबईच्या दिशेने जातांना नाशिक जिल्ह्याची हद्द तर नागपूरला जाताना नाशिक जिल्ह्याची छत्रपती संभाजीनगरची हद्द कोपरगांव तालुक्यातील जेऊरकुंभारी येथे इंटरचेंज आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरुन प्रवास करणारी अनेक वाहने वेगमर्यादा सोडून धावत असल्याने तसेच नो पार्किंगमध्ये वाहने उभी करण्यात येत असल्याने या मार्गावर वारंवार अपघात घडुन अनेकांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत असले तरीही अपघाताचे प्रमाण कमी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्योत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

समृध्दी महामार्गावर बरचशे अपघात हे टायर फुटणे, रोड हिप्नोसिसमुळे झोपेची डुलकी लागणे, वाहनावरील

नियंत्रण सुटणे, कमी वेगात चाललेल्या समोरील चालू वाहनास पाठीमागून धडक देणे, इ. कारणांमुळे बहुतांश अपघात झालेले आहेत. सन २०२५ मध्ये ओव्हरस्पीड केसेस बाबत ११८० व नो पार्कींग केसेस १४५ इतक्या केसेसची नोंद करण्यात आलेली आहेत.

पेट्रोलिंग दरम्यान मेगाफोनवरुन वाहन महामार्गावर उभे न करणेबाबत वारंवार सुचना दिल्या जातात. सदर कारवायांमुळे मागील वर्षीच्या तुलनेत प्राणांतिक अपघातांचे प्रमाण कमी झालेले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

मोरा (ता.उरण, जि.रायगड) येथील सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण असलेल्या पोलीस ठाण्याचे कामाकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत

(२१) ३३३० (२७-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरा (ता.उरण, जि.रायगड) येथील सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण असलेल्या पोलीस ठाण्याचे काम अद्यापही अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागरी किनाऱ्यावर नौदल, ओएनजीसी, जेएनपीटी बंदर तसेच तेल साठवणूकीची तसेच जागतिक वारसा म्हणून जाहीर करण्यात आलेले घारापुरी बेटावरील कोरीव लेणी अशी महत्वाची ठिकाणांच्या सुरक्षितेसाठी अत्याधुनिक यंत्रणा व सोईसुविधांसह मोरा येथे पोलीस ठाणे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, गत ६ ते ७ वर्षापासून निधीअभावी पोलीस ठाण्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे सागरी सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने पोलीस ठाण्यास निधी उपलब्ध करुन देण्यासह पोलीस ठाण्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

निधीसाठी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्तावामध्ये काहि त्रुटी उपस्थित करण्यात आल्या आहेत. सदरहू त्रूटींची पुर्तता झाल्यानंतर पोलीस ठाण्याचे काम पुर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारु, प्रवाशी वाहतूक तसेच अनधिकृतपणे मटका-गुटखा वाहतूक होत असल्याबाबत

(२२) ३३८१ (२७-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध प्रवाशी वाहतूक, अवैध दारु, अनधिकृतपणे मटका-गुटखा वाहतूक वाढली असून पोलीस जुजबी कारवाया करुन समाधानी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर शहरासह ग्रामीण भागात तसेच जिल्ह्यातील रेणापूर, निलंगा, औसा, देवणी, जलकोट, उदगीर, शिरूर व अनंतपाळ तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री, अवैधरित्या चालणारे मटका, जुगार अड्डे, राज्याच्या सिमाभागातून होणारी अवैध गुटखा वाहतूक यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, यातून नागरिकांचे गंभीर आजाराने मृत्यु होऊन त्यांचे कुटुंब उघड्यावर येत आहेत तसेच पोलीसांच्या जुजबी कारवायांमुळे

वाहनचोरी घटनांत वाढ झाल्याने यात परजिल्ह्यातील टोळ्या सक्रिय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात सन २०२४ मध्ये ७९१ गुन्हे दाखल असताना केवळ २७९ गुन्ह्याची उकल लातूर पोलिसानी केली असून आकडेवारी पाहता २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण ५ टक्क्यांनी कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध दारु, प्रवाशी वाहतूक तसेच अनधिकृतपणे मटका-गुटखा वाहतूक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

लातुर जिल्ह्यात सन २०२३ व सन २०२४ मध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

गुन्ह्यांचे शिर्षक	सन २०२३	सन २०२४
अवैध प्रवासी वाहतुक	१७८	१९३
अवैध दारु	२५०७	३१८०
अनधिकृत मटका जुगार	८५०	७८८
अनधिकृत गुटखा	५५	१६६

(२) हे अंशत: खरे आहे.

लातुर शहरासह ग्रामीण भागात तसेच जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये उपविभाग व पोलिस ठाणे अंतर्गत अवैध दारू विक्री, अवैधरित्या चालणारे मटका-जुगार, अवैध गुटखा या शिर्षाखाली सन २०२४ मध्ये अनुक्रमे ९९, १३, ०८ गुन्हे दाखल करण्यात आले असुन गुन्ह्यांच्या तपासातुन मोठया प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच वाहनचोरी या गुन्हयाच्या शिर्षाखाली सन २०२३ मध्ये ४३८ गुन्हे दाखल असुन सन २०२४ मध्ये ४६० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

लातुर जिल्ह्यात एकुण चोरीचे सन २०२३ मध्ये ९०५ गुन्हे दाखल असून त्यापैकी २८५ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. त्याचे प्रमाण ३१टक्के इतके आहे. तसेच सन २०२४ मध्ये ९१४ गुन्हे दाखल असुन त्यापैकी २८५ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. त्याचे प्रमाणही जवळपास ३१ टक्के इतके आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन याप्रकारच्या अवैध धंद्यांना आळा घालण्याकामी स्थानिक गुन्हे शाखा येथील २ अधिकारी व २५ पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात आली आहे. त्याशिवाय जिल्हयत ४ विशेष पथके नेमण्यात आले आहे व त्यात ४ पोलीस अधिकारी व १२ पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात आली आहे. तसेच वाहन चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ३ टोळ्यांना ताब्यात घेवुन मोठया प्रमाणावर वाहने जप्त करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

सांगली जिल्ह्यातील कराड-कडेगाव-पंढरपूर या रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

(२३) ३८६० (२५-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कडेगाव, खानापूर, आटपाडीसह दुष्काळी भागाच्या विकासाला चालना मिळावी, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची सोय व्हावी, यासाठी कराड-कडेगांव-पंढरपूर रेल्वेमार्गाची मागणी गेल्या पंधरा वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालिन केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने कराड-कडेगाव-पंढरपूर रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी दिली होती, परंतु अद्यापपर्यंत सर्वेक्षण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने कराड-कडेगाव-पंढरपूर या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाचे काम लवकर पूर्ण करुन सदर कामाकरिता निधीची तरतूद करुन या रेल्वेमार्गाचे काम मार्गी लावण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रताप सरनाईक (२५-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४) रेल्वे बोर्डाने, कराड-कडेगाव-पंढरपूर दरम्यान १५४ कि.मी. लांबीच्या रेल्वेमार्गाच्या Reconnaissance Engineering Cum Traffic Survey (RECT) ला सन २०१४-१५ मध्ये मंजुरी दिली होती. तथापि, दि.३१.०८.२०१८ रोजी रेल्वे बोर्डाने सदर सर्व्हेला स्थगिती दिली. सदर प्रकल्पास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील रस्त्यावर बेवारस तसेच भंगारात असलेल्या वाहनांबाबत

(२४) ४२१९ (२६-०४-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रस्त्यावर बेवारस उभ्या असलेल्या भंगार गाडयांना नोटीस लावून डंम्पिग ग्राऊंडमध्ये जमा करण्याची प्रशासनाची कारवाई कालबाह्य झाल्याने शहराच्या मुख्य व अंतर्गत रस्त्यावर अशा प्रकारच्या वाहनांचे प्रमाण वाढल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नाशिक जिल्हयातील सटाणा तहसील कार्यालय व पोलिस परेड मैदानावरील आवारात सटाणा पोलिसांनी जमा केलेल्या अपघातग्रस्त ,चोरी झालेल्या, बेवारस व जप्त केलेली असंख्य दुचाकी वाहने पडून असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरात गंज लागलेल्या भंगार वाहनामुळे तेथे कचरा साठून रोगराई पसरत असून तेथे वाहतूक कोंडी होत आहे तसेच अनेक असामाजिक गोष्टींनाही वाव मिळत असल्याने परिसरातील पोलीस ठाण्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी वारंवार नागरिकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०२५) : (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

सटाणा पोलीस ठाणे आवारात एकूण ६५ बेवारस वाहनांचे उप प्रादेशिक अधिकारी, परिवहन विभाग यांचेकडून मुल्यांकन करुन कार्यकारी दंडाधिकारी, बागलान यांची परवानगी घेऊन सदर ६५ वाहनांचा लिलाव करण्यात आला असून सदर रकमेचा शासकीय भरणा करण्यात आला आहे.

गृह विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०९.१०.२०१८ अन्वये रत्यावरील बेवारस वाहनांना हटविण्याची कार्यपध्दती निश्चत केली आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.रत्यावर बेवारस,भंगार गाडयांना सन २०२४ मध्ये २९९६ व जून, २०२५ अखेर १३१८ इतक्या नोटीस दिलेल्या आहेत.डंम्पिंग ग्राऊंडमध्ये जमा करण्यात आलेल्या गाड्या सन २०२४ मध्ये २३४० व जून, २०२५ अखेर २७९५ इतक्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील वांद्रे-कुर्ला संकुलात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत

(२५) ४२८० (२७-०४-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील वांद्रे-कुर्ला संकुल (B.K.C.) येथे औद्योगिक हब अस्तित्वात असून, येथे येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने बहुतांशी वेळा नियोजनशुन्य कामामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथे कामानिमित्त येणाऱ्या राज्यभरातील नागरिकांना यांचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०२५) :

(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

बीकेसी परिसर हा कार्पोरेट परिसर असल्याने नागरिकांची व वाहनांची सकाळी व सायंकाळच्या वेळेत वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्याने काही प्रमाणात नागरिकांची तसेच वाहन चालकांची काही वेळाकरिता गैरसोय होते. त्याकरिता महत्वाच्या जंक्शनवर वाहतूक पोलीस अमंलदारांची नेमणूक करुन वाहतूक सुरळीत करण्यात येते.

(३) (i) चुनाभट्टी कनेक्टर ब्रिजवर वर्दळीच्या वेळी नवीन काऊंटर लेन तयार करण्यात येते. जेणेकरुन तेथील वाहतूक सुरळीत चालू राहते.

(ii) बीकेसी वाहतूक विभागामध्ये काम चालू असल्याने बंद असलेली मिसिंग लिंक नव्याने चालू करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी झाली आहे.

(iii) नवीन काऊंटर लेन चालू केल्यामुळे चुनाभट्टी आता सिग्नल फ्री झाले आहे.

(iv) फॅमेली कोर्ट, इनकम टॅक्स जंक्शन येथे चालू असलेल्या ॲक्वा-३ मेट्रोचे काम पूर्ण झाल्याने सदरचा सिग्नल मोकळा करुन वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

(v) बीकेसी वाहतूक विभागातील सायकल/वॉकिंग ट्रक काढून टाकण्याची प्रक्रिया एमएमआरडीए कडून सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यास मदत होईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयात अत्यावश्यक यंत्रसामग्री व उपकरणे उपलब्ध करणेबाबत

(२६) ४४९० (२८-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयात कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील गोरगरीब व गरजू रुग्णांवर उपचार केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात एम.आर.आय., ए.बी.जी., व कान, नाक, घसाशास्त्र विभागासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांची आवश्यकता असून या यंत्रसामुग्री व उपकरणांच्या अभावामुळे गोरगरीब व गरजू रुग्णांना खाजगी

रुग्णालयात जाऊन महागडे उपचार करावे लागत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयात रात्रीच्या वेळी रुग्णांवर उपचार करण्यास दिरंगाई होत असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले असून ७६ वर्षीय वृद्ध रुग्णाला ६ तासांच्या प्रतीक्षेनंतर दाखल करून घेण्यात आल्याची गंभीर घटना दिनांक ०८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आलेआहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत तत्कालीन मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी सूचना देवूनही असे प्रकार वारंवार घडत असल्याने रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांची उपलब्धता करुन देणेसह रुग्णसेवा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडून एम. आर.आय.मशीन चे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले असून सदर यंत्र स्थापित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच ए.बी.जी. व कान, नाक व
घसाशास्त्र विभागासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणे प्रस्थापित करण्यात आलेले असून त्याद्वारे रुग्णसेवा सुरळीतपणे सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५)हे खरे नाही. रुग्णसेवा सुरळीत होणेकरीता या रुग्णालयात सद्य:स्थितीत अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांची उपलब्धता होत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी वर्गाकडून सातत्याने अनियमितता व आर्थिक मागणी होत असल्याबाबत

(२७) ४५३६ (२५-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील श्री स्वप्निल माने, परिवहन अधिकारी, श्री गणेश विघ्ने, मोटार वाहन निरिक्षक, श्री. प्रदीप कुमार बिराजदार व संतोष जाधव या अधिकाऱ्यांकडून बीडमधून व बीडच्या बाहेरुन जात असलेला राष्ट्रीय महामार्ग नवीन क्र. ५२ वर सर्व प्रकारच्या वाहन धारकांकडून दमदाटी करुन नियमात बसणार नाही, अशा स्वरुपाची पैशाची मागणी केली जात असल्याचे व सदर मागणी पुर्ण न झाल्यास अवाजवी तात्काळ दंड आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनियमितता व गैरकृत्यामुळे शासनाची अप्रतिष्ठा सदरील अधिकाऱ्यांकडून सातत्याने होत असल्याचे व त्यामुळे नागरीकांना प्रचंड प्रमाणात त्रास होत असल्याचे तसेच मतदारसंघातील व जिल्ह्यातील वाहन धारकांकडून या कार्यालयाने आर्थिक हप्तेखोरीसाठी त्रयस्त माणसाची नेमणुक केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या सर्व बाबींची संचिकानिहाय, दैनंदिनीनिहाय उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे, तसेच गृह विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन उघड चौकशी व्हावी, अशी तेथील नागरिक, वाहनचालक मालक संघटना यांचेकडून शासनाकडे मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द नोंदविण्यात आलेल्या सदर एफआयआरनुसार व शासन परिपत्रकानुसार कोणती कारवाई केली याबाबत अद्याप संदिग्धता असल्याने त्याबाबतच्या अहवालाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, बीड यांनी मागणी केली असतांनाही सदर अहवाल अद्याप त्यांना देण्यात आला नसल्याचे दिनांक ३ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रताप सरनाईक (२२-०८-२०२५) : (१), (२) व (३)

मा.श्री. संदिप रविंद्र क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांनी या संदर्भात तक्रारअर्ज सादर केला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी आरोपांची चौकशी करुन मा.विधानसभा सदस्य यांना दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
४) श्री.स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व श्री.गणेश विघ्ने, मोटार वाहन निरीक्षक या दोन्ही अधिकाऱ्याविरुध्द बीड येथे कोणताही एफ. आय.आर नोंदविण्यात आलेला नाही.
५) प्रश्न उदभवत नाही.

नागपूर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील उड्डाणपूलांवर सातत्याने होत असलेले अपघात रोखण्याबाबत

(२८) ४६२२ (२५-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील ११ उड्डाणपूलांवर माहे जानेवारी, २०२३ ते नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत २२ प्राणांतिक अपघात घडले असून त्यात एकूण २२ जणांनी प्राण गमावले असल्याची धक्कादायक बाब दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उड्डाणपूलात सदर उड्डाणपूल अत्यंत घातक ठरला असून या उड्डाणपुलावर घडलेल्या अपघातांची संख्या सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने नागपूर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील ११ उड्डाणपूलांवर सातत्याने होत असलेले अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०२५) : (१) नागपूर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील माहे जानेवारी, २०२३ ते नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत एकूण ३६ पुलांपैकी १५ उड्डाणपुलांवर २२ प्राणांतिक अपघात घडले असून त्यात एकूण २७ जणांनी प्राण गमावले आहे.
(२) सन २०२३ मध्ये नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील एकूण ३१ उड्डाणपुल पैकी सदर उड्डाणपूलावर ३ प्राणांतिक रस्ते अपघात दाखल आहे व सन २०२४ मध्ये नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील एकूण ३६ उड्डाणपुल पैकी सदर उड्डाणपूलावर १ प्राणांतिक रस्ते अपघात दाखल आहे.
(३) सन २०२३ मध्ये नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील ११ उड्डाणपूलावर सातत्याने होत असलेले अपघात रोखण्यासाठी शासनाचे वतीने वाहतूक पोलीस विभागामार्फत घटनास्थळी भेटी देऊन त्या ठिकाणी रस्ते विभागाचे अधिकारी यांना बोलावून त्या ठिकाणी उड्डाणपूलावर वेग मंदावण्यासाठी रंम्बलर स्ट्रिप्स, कॅट आईज, लेन मार्कींग, हजार्ड मार्क, वाहन वेग मर्यादा फलक, वाहने हळू चालवा, अपघात प्रवणस्थळ इत्यादी अशी फलके लावण्याबाबत संबंधित विभागाला कळविले असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
i) वाहतूक विभागा तर्फे नियमबाह्य पध्दतीने वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर मोटर वाहन अधिनियम मधील अनेक कलमांन्वये सतत चलान कारवाई करण्यात येते.

ii) सन २०२३ व सन २०२४ दरम्यान वाहतूक विभाग नागपूर शहर तर्फे मोटर वाहन अधिनियम मधील विविध कलमांन्वये कारवाई करण्यात येते.
iii) तसेच वाहतूक विभागा तर्फे वाहन चालकांना वेळोवेळी वाहतूक नियमांबाबत समुपदेश तसेच जनजागृती करण्यात येते.
iv) रस्ता सुरक्षा दल, वाहतूक विभागा तर्फे सतत विद्यालय/महाविद्यालय येथे जाऊन विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाबाबत जनजागृती करण्यात येते.
v) तसेच अपघात सेल, वाहतूक विभागा तर्फे प्रत्येक अपघाताचे ठिकाणी भेटी देऊन सदर ठिकाणी अपघातास प्रतिबंध होण्याकरिता आवश्यक उपाययोजना सुचवून त्या लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता संबंधित रस्ते विभागाला वेळोवेळी पत्र व्यवहार करुन पाठपुरावा केला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाच्या महसूलवाढीसाठी पाच जणांचा अभ्यास गट स्थापन करण्याबाबत

(२९) ५५७३ (२९-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाच्या माध्यमातून महसूलवाढीसाठी पाच जणांचा अभ्यास गट स्थापन करण्याचा निर्णय गृहविभागातर्फे दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीमध्ये कोणकोणाचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीला किती महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

श्री. अजित पवार (१५-०७-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
राज्य उत्पादन शुल्काच्या माध्यमातुन राज्याच्या महसूलात वाढ होणाच्या दृष्टीने पाच जणांचा अभ्यासगट दि.०९.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नेमण्यात आला होता.
(२) सदर समितीमध्ये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) हे अध्यक्ष तर अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (राउशु), आयुक्त (राज्यकर) वस्तू व सेवा कर, मुंबई हे सदस्य आणि आयुक्त (राउशु) हे सदस्य सचिव होते.
(३) व (४) सदर अभ्यासगट/समितीमार्फत शासनास दि.२२.०४.२०२५ रोजी शिफारशी सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये समितीने विभागाचे राज्य उत्पादन शुल्क व व्हॅट च्या माध्यमातून महसूलवाढ, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे बळकटीकरण तसेच व्यवसाय सुलभीकरण (EODB) इत्यादी शिफारसी सादर केलेल्या आहेत.
याबाबत काही प्रकरणी कार्यवाही करण्यात आलेली आहे तर काही कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील विविध समस्यांबाबत

(३०) ६२७६ (२७-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे सोयी-सुविधांचा खालावलेला दर्जा, नियोजनशून्य कारभार, गरम पाण्याचा अभाव, वायफाय तसेच इतर समस्यांबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिल्ली येथील

दौऱ्याच्यावेळी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०२५) :(१) हे खरे नाही.
महाराष्ट्र सदनामध्ये सेंट्रलाइज हिटींग प्लांट द्वारे २४ तास गरम पाण्याच्या उपलब्धेबाबत व्यवस्था करण्यात आली आहे. महाराष्ट्र सदनाच्या इमारतीमध्ये वायफाय (Wi-Fi) सुरळीतपणे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने इमारतीमध्ये ठिकठिकाणी राउटर्स (Routers) ठेवण्यात आले असून इंटरनेटची वेगमर्यादा १०० Mbps वाढविण्यात आलेली आहे. तसेच अतिथींना वेळोवेळी महाराष्ट्र सदनामार्फत आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नकाशि (जि.अकोला) येथील विद्यार्थी शिक्षणासाठी धोकादायक पद्धतीने प्रवास करीत असल्याबाबत

(३१) ६५७९ (२६-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नकाशि (जि.अकोला) येथील विद्यार्थी शिक्षणासाठी वाडेगांव येथे येत असून त्यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धोकादायक पद्धतीने शाळकरी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धोकादायक वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांकडे दुर्लक्ष करणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली व येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रताप सरनाईक (१६-०७-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वाहन तपासणी पथकाद्वारे वाहन तपासणी करण्यात येते.
विनापरवाना शाळकरी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर व वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा व त्या अंतर्गत असलेल्या नियमानुसार नियमितपणे कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील उद्योजकांना त्रास देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अंतर्गत कारवाई करण्याबाबत

(३२) ६६१९ (२५-०४-२०२५). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड शहरात पोलीस आयुक्त प्रशासकीय इमारतीच्या भुमीपूजन प्रसंगी उद्योजकांना त्रास देणारे कोणत्याही राजकीय पक्षाचे असले तरीही त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अंतर्गत कारवाई करण्याचे सक्त आदेश पोलीस दलाला दि.६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारासदेण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, ठाणे, नागपूर इ. जिल्ह्यामध्ये स्थानिक गुंड, उद्योजकांना कच्चा माल खरेदी करणे, कामगार ठेवणे, इ. विविध कारणाकरता धमक्या देणे, बळजबरीने संप घडवून आणणे, दरमहा

ठरावीक रक्कम खंडणी स्वरुपात मागणे इ. विविध कारणाने उद्‌योजकांना त्रास देत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, सातारा इ. ठिकाणच्या (जिल्हा मधील) एम.आय.डी.सी. मध्ये यापूर्वी ज्या उद्योजकांनी लेखी तक्रारी केल्या आहेत त्याप्रकरणी कोणतीही दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यात उद्योजकांना त्रास दिल्याबाबत पोलीस घटकप्रमुखांच्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत:-

अ.क्र	घटकाचे नाव	दाखल गुन्हे	अटक आरोपी
१.	पो.आ., बृहन्मुंबई	२	३
२.	पो.आ., नवी मुंबई	१	३
३.	पो.आ., पिंपरी-चिंचवड	२	४
४.	पो.आ., नाशिक शहर	२	७
५.	पो.अ., जालना	१	३
६.	पो.अ., बीड	१	८
	एकूण	९	२८

(३) हे खरे नाही.
(४) व (५) उद्योजकांकडून लेखी तक्रार प्राप्त झाल्यास त्याची तात्काळ दखल घेवून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

छत्रपती सभांजीनगर येथील वाळूज औद्योगिक क्षेत्रातील खंडणी लूटमारी व नशेखोरीच्या घटना वाढत असल्याबाबत

(३३) ६६५६ (२६-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती सभांजीनगर येथील वाळूज औद्योगिक क्षेत्रातील खंडणी लूटमारी व नशेखोरीच्या घटना वाढत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज औद्योगिक क्षेत्रात माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये खंडणी बाबतचा एकही गुन्हा दाखल नसुन लुटमार जबरी चोरी बाबत एकुण ०२ गुन्हे दाखल आहेत व नशेखोरी संदर्भात अंमली पदार्थाचे सेवन करणे व बाळगणे यासंबंधित एकुण ०९ गुन्हे दाखल केले आहेत.
(२) होय, सदरहु गुन्ह्यांसदर्भात चौकशी करण्यात आली आहे.

(३) वाळुज औद्योगिक क्षेत्रातील पोलीस ठाणे, एम.आय.डी.सी. वाळुज येथे लुटमारी जबरी चोरीबाबत गु.र.नं. ८६/२०२५ व गु.र.नं. ११४/२०२५ याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आली असुन अनुक्रमे भा.न्या.सं. कलम ३०९(६) अन्वये व भा.न्या.सं. कलम ३०९(४), ३(५) अन्वये कारवाई करण्यात आली आहे तसेच आरोपींना अटक करुन त्यांच्याकडुन गुन्हयांतील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच वाळुज औद्योगिक क्षेत्रातील पोलीस ठाणे, एम.आय.डी.सी. वाळुज येथे नशेखोरी संदर्भात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या व बाळगणाऱ्या इसमांविरुध्द फेब्रुवारी, २०२५ मध्ये NDPS कायाद्यांतर्गत गुन्हे दाखल करुन एकुण ०९ आरोपींना अटक करुन NDPS Act कलम २७ व कलम २०(ब)(३), ८(क) अन्वये कारवाई करण्यात आलेली आहेत.

वरिल प्रमाणे अटकेतील सर्व आरोपींविरुध्द BNSS कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) विलंब नाही.

करोडी (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील वाळूज एमआयडीसी परिसरात तांदूळ प्रक्रिया करणाऱ्या कंपनीवर छापा टाकल्याबाबत

(३४) ६६५७ (२६-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करोडी (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील वाळूज एमआयडीसी परिसरात पोलीस पथकाने तांदूळ प्रक्रिया करणाऱ्या कंपनीवर दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास छापा मारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

बालविकास प्रकल्प अधिकारी श्री.निलेश राठोड यांच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन दौलताबाद येथे दि.०३.०२.२०२५ रोजी गु.र.नं. १४/२०२५ कलम ३१८(४), २३८, ३१६(५) भा.न्या.संहिता २०२३ सह कलम ३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता दि. ०१.०२.२०२५ रोजी व त्यापुर्वीपासुन गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशनचे मालक- संजय भगिरथमल अग्रवाल, कंपनीचे व्यवस्थापक- मतीनोद्दीन गझनफरोद्दीन काझी, सुपरवाईझर- बलवंतसिंग चौहान व रोहीत सिंग यांनी गजानन ॲग्रो सेल्स कॉर्पोरेशन गट क्र.१११ करोडी येथे महिला व बाल विकास विभाग एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचा विक्री करीता उपलब्ध नसलेला महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक वितरणाचा माल स्वता:च्या आर्थिक फायद्याकरिता चोरट्या मार्गाने हस्तगत करुन व त्या मालामध्ये फेरबदल करुन त्याचे २५ किलो वजनाच्या प्रिमिक्स तांदुळाच्या बॅगमध्ये रुपांतर करुन त्यावर अन्सेबा (ANSEBA) असे खाजगी लेबल लावुन पुरावा नष्ट करुन काळया बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणुक करुन महाराष्ट्र शासनाची एकुण १,९६,१४८/- रुपयाची फसवणुक केल्याचे निदर्शनास आल्याने उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल करुन सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयासह राज्यातील ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत आयव्हीएफ (इन विट्रो फर्टीलायझेशन) सेंटर मंजूर करणेबाबत.

(३५) ६६६१ (२८-०४-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयासह राज्यातील ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शासनाकडून आयव्हीएफ (इन विट्रो फर्टीलायझेशन) सेंटर मंजूर करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी पाच आयव्हीएफ सेंटर निधीच्या प्रतीक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर आयव्हीएफ सेंटरला निधी तातडीने देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (०३-१०-२०२५) : (१), (२) व (३) राज्यातील ०९ संस्थेमध्ये आयव्हीएफ सेंटर ऑन टर्न की बेसीसवर यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी ०४ संस्थेमध्ये यंत्रसामुग्री स्थापीत करण्यात आलेली आहे. उर्वरित ०५ संस्थेमध्ये निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने यंत्रसामुग्री खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

नांदेड येथील सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण कार्यालयातील सोयी सुविधाबाबत

(३६) ७०५३ (२७-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण कार्यालयास स्वत:ची इमारत नसुन कार्यालयात सोयी- सुविधांचा अभाव असल्याचे माहे-जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयात फर्निचर, पुरेशी भौतीक सुविधा, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी गैरसोय असून कार्यालयात पुरेशा कर्मचारी वर्ग नसल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर अधिक कामाचा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेच्या जिल्हा स्तरीय समिती अध्यक्षांना कार्यालयात स्वतंत्र्य कक्ष न दिल्याने कामकाजासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त कार्यालयात सहाय्यक संचालक हे पद रिक्त असून समकक्ष वेतनश्रेणीतील पुर्णवेळ अधिकाऱ्याची येथे प्रतिनियुक्ती करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले आहे, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अतुल सावे (१७-०७-२०२५) : (१) व (२) अंशत: खरे आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे नांदेड येथील सहाय्यक संचालक हे कार्यालय या विभागाची स्वत:ची जागा व इमारत नसल्याने तात्पुरता स्वरूपात सामाजिक न्याय भवनात कार्यरत करण्यात आले आहे. सदर कार्यालयात आवश्यकतेनुसार फर्निचर उपलब्ध असून पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे. सहाय्यक संचालक, नांदेड कार्यालयासाठी एकूण १७ कर्मचारी वर्ग मंजूर असून त्यापैकी ६ पुर्णवेळ कर्मचारी कार्यरत असून आवश्यकते प्रमाणे विभागाच्या आश्रमशाळांतील अतिरीक्त कर्मचारी घेण्यात आले आहे.

३) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचे जिल्हास्तरीय अध्यक्ष हे त्या-त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहेत. त्यांना त्यांचे स्वतंत्र कार्यालय उपलब्ध असल्याने त्यांचेसाठी या विभागाच्या कार्यालयात स्वतंत्र कक्षाची सोय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता नाही.

(४), (५) व (६) इतर मागास बहुजन कल्याण विभागात नविन पदभरती करण्याचे काम प्रगतीत आहे. त्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सहायक संचालक / प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी या संवर्गाच्या २६ पदांचे मागणीपत्र पाठविण्यात आले असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत सदर पदाचा अतिरीक्त कार्यभार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या त्या जिल्हातील सहायक आयुक्त यांचेकडे सोपविण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मागणीपत्रानुसार अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर त्यांची विभागाच्या सहाय्यक संचालक पदावर नियुक्ती करण्याचे नियोजन आहे. तोपर्यंत सहाय्यक संचालक, नांदेड या पदावर समकक्ष वेतनश्रेणीतील पुर्ण वेळ अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत इच्छूकता मागविण्यात आल्या असुन त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील सीमावर्ती भागातून व शेजारील कर्नाटक राज्यातील सीमावर्ती भागातून गुटख्याची अवैधपणे वाहतूक व विक्री होत असल्याबाबत

(३७) ७०५६ (२७-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील सीमावर्ती भागात व कर्नाटक राज्यातील बीदर, औराद, दापका, चिखली, कमलानगर या सीमावर्ती भागातून सर्रासपणे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंध असलेला गुटखा वाहतूक होत असून मुक्रमाबाद, आदमपूर ता. देगलूर, रावणकोळा, सावरमाळ या महाराष्ट्र राज्यातील सीमावर्ती भागात हजारों रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गुटखा तस्करी कायमस्वरूपी बंद करण्यासाठी तसेच कायमस्वरुपी गस्तपथक नेमणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यातील सिमावर्ती भागात मुक्रमाबाद, देगलुर, मरखेल असे तीन पोलीस स्टेशन असनु या पोलीस स्टेशन अंतर्गत माहे जानेवारी, २०२५ ते माहे जुलै २०२५ दरम्यान खालील प्रमाणे एकुण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

१. पो.स्टे. मुक्रमाबाद, जिल्हा नांदेड गु.र.नं ०४/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५

२. पो.स्टे. देगलुर, जिल्हा नांदेड गु.र.नं ४१/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५,२२३ सहकलम २६(२), २७, २३, ३०(२), (अ), ५९, ४ अन्न सुरक्षा मानके कायदा सन २००६

३. पो.स्टे. देगलुर, जिल्हा नांदेड गु.र.नं ५०/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५,२२३ सहकलम २६(२), २७, २३, ३०(२), (अ), ५९, ४ अन्न सुरक्षा मानके कायदा सन २००६

४. पो.स्टे. मरखेल, जिल्हा नांदेड गु.र.नं १८६/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५, २२३

५. पो.स्टे. देगलुर, जिल्हा नांदेड गु.र.नं ३४४/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५,२२३, ३(५) सहकलम २६(२), २७, २३, ३०(२), (अ), ५९, ४ अन्न सुरक्षा मानके कायदा सन २००६

६. पो.स्टे. देगलुर, जिल्हा नांदेड गु.र.नं ३७९/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २७४, २७५,२२३, ३(५) सहकलम २६(२), २७, २३, ३०(२), (अ), ५९, ४ अन्न सुरक्षा मानके कायदा सन २००६

७. पो.स्टे. देगलुर, जिल्हा नांदेड गु.र.नं ३८४/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १२३, २२३, २७४, २७५, सहकलम २६, २७, ३०(२), (अ), ५९, अन्न सुरक्षा मानके कायदा सन २००६

(२) व (३) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन उपरोक्त प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांना सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटण करण्यासाठी आदेशीत करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या गुटखा तस्करी चे प्रकार आढळुन येताच त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिवती (जि.चंद्रपूर) या तालुक्यात दिवाणी व फौजदारी न्यायालय सुरू करण्याबाबत

(३८) ८०६८ (०८-०९-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) या तालुक्यात निर्मीतीपासून २३ वर्षे लोटूनही दिवाणी व फौजदारी न्यायालय सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी दिनांक ११मार्च, २०२५ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०२५) : (१) होय,हे खरे आहे.

(२) सदर निवेदन दि. ०१ एप्रिल २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

दिंडोशी, गोरेगांव (पूर्व) येथील सत्र आणि दिवाणी न्यायालय बोरिवली (पश्चिम) येथे स्थलांतरित करण्याबाबत

(३९) ८३३३ (०७-०८-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव (पूर्व) दिंडोशी येथील सत्र आणि दिवाणी न्यायालय बोरीवली (प.) येथे स्थलातंरीत करुन बोरिवली न्यायालयाची कक्षा वाढवून विस्तार करणेबाबतची मागणी श्री अरुण सुर्वे, अध्यक्ष, मराठी वकील उत्कर्ष संघटना यांचे निवेदनासह लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी पत्र देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०२५) : (१) होय, मुंबईतील गोरेगाव (पूर्व) दिंडोशी येथील सत्र आणि दिवाणी न्यायालय बोरीवली (प.) येथे स्थलांतरीत करुन बोरीवली न्यायालयाची कक्षा वाढवून विस्तार करण्याबाबतचे श्री. अरुण सुर्वे, अध्यक्ष, मराठी वकील उत्कर्ष संघटना यांच्या दि.०४.१०.२०२४ च्या निवेदनासह श्री. सुनिल प्रभू, मा. वि.स.स. यांचे दिनांक २६.०३.२०२५ चे पत्र मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडून या कार्यासनास दिनांक०५.०९.२०२५ रोजी प्राप्त झालेले आहे.

(२) राज्यातील सर्व न्यायालयांचे नियंत्रण मा. उच्च न्यायालयाकडे असल्यामुळे सदर निवेदन प्रबंधक (निरीक्षणे), मा.

उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई तसेच मा. प्रधान न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई यांना उचित कार्यवाहीसाठी दि. ०५.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. व सदर पत्राची प्रत श्री. सुनिल प्रभू, मा.वि.स.स. यांना माहितीस्तव अग्रेषित केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर नोंदविण्यात आलेल्या गुन्हाबाबत

(४०) ८७९६ (०७-०८-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या १० जणांविरुध्द मागील तीन महिन्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, येत्या सण-उत्सवादरम्यान एखाद्या व्हायरल पोस्टमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरिता बुलढाणा पोलिस अधिक्षक यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०२५) : (१) व (२) बुलढाणा जिल्ह्यात मे २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीत सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणा-या १५ व्यक्तींवर ०७ दखलपात्र व ३ व्यक्तींवर ३ अदखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
बुलढाणा जिल्ह्यात सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणा-यांविरुद्ध खालील प्रमाणे कारवाई करण्यात येते.
• बुलढाणा पोलीस घटकामध्ये सोशल मिडीया मॉनिटरींग सेल कार्यरत आहे. तसेच सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याबाबत तात्काळ दखल घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
• सण उत्सवा दरम्यान एखाद्या पोस्टमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरीता कोणीही आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करु नये यादृष्टीने सोशल मिडीया व्दारे जनजागृती करण्यात येते. तसेच सण उत्सवा संदर्भात पोलीस स्टेशन स्तरावर शांतता समितीच्या बैठका आयोजित करण्यात येतात. सदर बैठकामध्येसुध्दा उत्सवा दरम्यान कोणीही सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणार नाही यादृष्टीने, तसेच कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेमध्ये पार पाडण्याचे दृष्टीने आवाहन करण्यात येते.
• मागील उत्सवामध्ये दाखल गुन्हयांतील आरोपींविरुध्द आगामी उत्सवासंदर्भाने प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.
• उत्सवा दरम्यान कोणतीही अप्रीय घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यादृष्टीने योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विलेपार्ले (मुंबई) येथे राहणाऱ्या व्यापाऱ्याची कोऱ्या नोटा देवून केलेली फसवणूक

(४१) ९५०० (१९-०९-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विलेपार्ले (मुंबई) येथे राहणारे व्यापारी श्री.निशीत गांधी यांची हवालामार्फत आलेल्या रुपयांच्या बंडलमध्ये वीस लाखाच्या कोऱ्या नोटा देवून फसवणूक केली असल्याचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी डिंडोशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०२५) :
(१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.
विलेपार्ले (मुंबई) येथे राहणारे व्यापारी श्री. निशीत गांधी यांची हवालामार्फत पैसे घेवुन आलेल्या २ लोकांनी ५०० रुपयांच्या नोटांचे बंडलच्या दर्शनी भागावर पाचशे रूपयांच्या नोटेसारखा दिसणारा प्रिटेंड कागद व त्याचे खाली नोटांचे आकाराचे कोरे कागद देवून बनावट पाचशे रूपयाची नोट हे खरे असल्याचे भासवून संगणमत करून फसवणूक केली असल्याने दिंडोशी पोलीस ठाणे येथे दि.०२.०५.२०२५ रोजी गु.र.क्र. २८५/२५, भारतीय न्यायसंहिता, कलम ३१६(२), ३१८(४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील चाकण पोलिस स्टेशन प्रशासकीय कार्यालय बांधकाम करण्यासाठी चाकण नगरपरिषद हद्दीतील गट नंबर २४९३ जागा हस्तांतरीत करण्याबाबत

(४२) १०२६९ (०७-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील चाकण पोलिस स्टेशनमार्फत विविध ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत प्रस्ताव सन २०२१ मध्ये संबंधित पोलीस विभाग व पोलीस आयुक्त यांना सादर करण्यात आला असून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच चाकण पोलिस स्टेशनच्या प्रशासकीय कार्यालयाचे बांधकाम करण्यासाठी चाकण नगरपरिषद हद्दीतील गट नंबर २४९३ या जागेची मागणी सन २०१४ पासून केली असून, सदरहू मागणीकडे दुर्लक्ष करुन सन २०१८ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने परस्पर जागा जनसुविधा केंद्र बांधण्यासाठी HPCL या कंपनीला दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन व अन्य प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी नगरपरिषद हद्दीतील गट नंबर २४९३ ही जागा जिल्हाधिकारी, पुणे यांनी HPCL या कंपनीकडून हस्तांतरण करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
चाकण पोलीस स्टेशनचे विभाजन करुन (चाकण पोस्टे मधील तत्कालीन महाळुंगे पोलीस चौकीचे रुपांतर पोलीस स्टेशन मध्ये करुन) नव्याने महाळूंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी चाकण पो.स्टे. येथुन पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय येथुन मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे मार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने महाळूंगे एमआयडीसी पो.स्टे. निर्मितीस गृह विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.पीओएस-०८१९/प्र.क्र.१२०/पोल-३, दि.८/१०/२०२१ रोजीचे शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेली असून त्यानुसार सद्यस्थितीत महाळुंगे एमआयडीसी पोलास स्टेशन कार्यान्वित सुध्दा झाले आहे.
(२), (३), (४) व (५)
चाकण पोलीस स्टेशनची इमारत मौजे चाकण येथील सिटी स.न.११९९ मधील ७१८ चौ.मी. जागेमध्ये कार्यान्वित असून सदर जागा अतिशय तुटपुंजी असल्याने मौजे चाकण ता. खेड गट नं. २४९३ मधील १ हे. १२ आर मधील काही जागा चाकण नगरपरिषदेची प्रशासकीय इमारत बांधणेसाठी तसेच ४० गुंठे जागा चाकण पोलीस स्टेशनसाठी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत दि.२३/०२/२०१८ अन्वये प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने सदर

बाबत त्रुटी काढून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून सद्यस्थितीबाबत सविस्तर अहवाल मागविला आहे. जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडुन त्रुटी पुर्तता करुन अहवाल सादर करणेबाबत कार्यवाही चालु आहे.

देवनार पशुवधगृहातील पशु तपासणी शुल्क कमी करण्याबाबत

(४३) १०५८९ (०७-०८-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवनार पशुवधगृहातील पशु तपासणी शुल्क कमी करण्याकरिता मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री व पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पत्राच्या अनुषंगाने शुल्क तपासणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) दि. ०३.०६.२०२५ च्या शासन अधिसूचनेव्दारे कत्तलपुर्व तपासणी करीता आकारण्यात येणारे तपासणी शुल्क रु. २००/-ऐवजी रु. १००/- एवढे करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मोहिदा (ता.चोपडा, जि.जळगाव) - होळनाथे (ता.शिरपूर, जि.धुळे) पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(४४) १११०१ (२३-०८-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहिदा (ता.चोपडा, जि.जळगाव) - होळनाथे (ता.शिरपूर, जि.धुळे) या पुलाचे बांधकाम शिरपूर उपविभागामार्फत १९ वर्षा पूर्वी झालेले असून या पुलाला कठडे नसल्यामुळे पुलावरील कॉंक्रीट पूर्णपणे उखडलेले असल्याने सदर पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलावरील रस्त्यावर जागो जागी खड्डे पडलेले असून पुलाचा भराव वाहून गेल्याने वर्षभरात अनेक अपघात होऊन त्यात सात ते आठ प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोहीदा-होळनाथे पुलाची दुरुस्तीसाठी तात्काळ निधी मंजूर करून पुलाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३०-०९-२०२५) : (१) व (२) सदर पुलास दूरूस्ती करण्याची आवश्यकता आहे.

(३) होय, निवेदन प्राप्त आहे,

(४) सदर पुलाची दुरुस्ती करणेसाठी रु.३५.०० लक्ष रक्कमेच्या कामाचे दिनांक २३/०४/२०२५ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम प्रगतीत असुन दि. २५.०९.२०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शेतकऱ्यांच्या शेत मालाला हमीभाव मिळणेबाबत

(४५) ११४६५ (१८-०८-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत्या महागाईमुळे शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यात दिवसेंदिवस वाढ होत असतांना शेतकऱ्यांच्या शेत मालाला भाव मिळत नसल्याने शासनाने जाहीर केलेला हमी भावापेक्षा कमी दराने धान खरेदी करता येत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कडधान्य हमी भावा पेक्षा कमी दराने खाजगी व्यापारी खरेदी करीत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, त्यानुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली, तसेच हमीभावाने कडधान्य खरेदी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (३०-०९-२०२५) : (१) विभागाकडून केंद्र शासनाने जाहीर केलेल्या हमी भावाप्रमाणे धान खरेदी करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये, एफएक्यु (FAQ) दर्जाच्या कडधान्याची आवक होत नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आवक होणाऱ्या नॉन एफक्यु (Non FAQ) दर्जाच्या कडधान्याची स्थानिक व्यापाऱ्यांकडुन हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात येत आहे.

(३) कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर येथे हमी भावापेक्षा कमी दराने धान खरेदी केल्याबाबतच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तुमसर यांचेकडुन चौकशी करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार दि. १७ जून, २०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांच्याकडून सभापती/सचिव व सर्व संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, तुमसर यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रामा-२३६ कळंब-लातुर रस्त्याचं काम अनेक वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(४६) ११६४१ (२३-०८-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील अनेक वर्षापासून रामा २३६ कळंब लातुर या रस्त्याचे काम कार्यकारी अभियंता, लातुर यांचेकडून सुरु असून सदर काम अनेक ठिकाणी अपुर्ण अवस्थेत असून रस्त्यांची रुंदी वाढविण्यात आली असली तरी पुलांचे रुंदीकरण अद्यापपर्यंत करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यासह दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी करुनही संबंधितांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडकी ता.कळंब या गावाजवळ अरुंद पुलामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने व त्या ठिकाणी कुठलाही अरुंद पुल असलेला फलक नसल्यामुळे श्री.प्रशांत महाजन व श्री.मंगेश महाजन या दोन तरुणांचा दुर्देवी मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार दोषी कंत्राटदाराविरुध्द तसेच संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०८-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

सदरचे काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) खडकी ता. कळंब या गावाजवळील अरुंद पूलावर दिशा दर्शक व सुचना फलक लावलेले आहेत. पोलीस स्टेशन कळंब येथे दिनांक १०/०३/२०२५ रोजीच्या FIR नुसार दुचाकी वाहनास अज्ञात वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने अपघात होऊन दोन तरुणांचा मृत्यु झाल्याची नोंद आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

लातूर-कळंब राज्य महामार्ग नदीवरील पुलाची व रस्त्याची रुंदी कमी असल्यामुळे होत असलेले अपघात

(४७) १२३०५ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर-कळंब राज्य महामार्गावरील तांदुळजा येथील मुरुडा नदीवरील पुलाची रुंदी कमी आणि रस्त्याची रुंदी अधिक असल्यामुळे तसेच अपघातप्रवण (ब्लॅक स्पॉट) क्षेत्रांमध्ये वाहनधारकांना सूचना देणारे फलक लावण्यात आलेले नसल्यामुळे अपघातांमध्ये वाढ झाली असून, अनेक नागरिकांचे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांदुळजा येथील मुरुडा नदीवरील पुलाचे रुंदीकरण करण्याचे काम केव्हा पूर्ण होणार असून काटगाव चौक, हरंगूळ नाला, भोईसमुद्रगा, तांदुळवाडी, काटगाव गावापुढील कॅनॉलवरील पूल, गादवड येथील जुने पूलांचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यातील सर्व राज्य व राष्ट्रीय महामार्गांचा सखोल सर्वेक्षण करून, जिथे आवश्यक असेल तिथे रस्ता दुभाजक, नदीपात्रांवरील पुलांची रुंदी वाढवणे, अपघातप्रवण क्षेत्रात सूचना फलक आणि आवश्यकतेनुसार गतिरोधक बसवणे या बाबींची पूर्तता सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ करावी यासाठी शासन कोणती उपाययोजना करत आहे,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन जबाबदार संबंधित कंत्राटदार आणि अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०८-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

सदर पूलावर दिशा दर्शक फलके, सूचना फलके, हझार्ड मार्कर व पाईप डिलायनेटर्स बसविण्यात आले आहेत. पोलीस स्टेशन मुरुड येथे FIR दि.१२/०५/२०२५ व ०२/०७/२०२५ रोजी दोन अपघांची नोंद आहे. सदर FIR मध्ये अपघात दुचाकी वाहने हयगईने, निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालविणे यामुळे झाल्याचे नोंदविले आहे.

(२) लातूर–कळंब रामा-२३६ या रस्त्याचे काम प्रगतीपथावर असुन सदर रस्त्यावरील तांदूळजा येथील मुरुडा नदीवरील पूलाची दुरुस्ती करण्याचे मंजूर काम लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मौजे हरंगुळ नाला, भोईसमुद्रगा, काटगाव, गादवड गावातील पुलांची पुनर्बांधणीचे काम व तांदूळवाडी , काटगांव, गादवड येथील कॅनॉलवरील पुलांचे रुंदीकरणाचे काम मंजूर असुन सदर कामे लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील सर्व रस्त्यांवरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवणे, रस्त्यांवरील सूचना फलक लावणे, पादचारी पूल तपासणी, पूल तपासणी, रस्त्यावरील पट्टे मार्कींग, Blinker, Barricading, Reflector लावणे, घाट रस्त्याची पाहणी करुन Loose Rocks काढणे याबाबतच्या सूचना शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत.

तसेच विभागामार्फत हाती घेण्यात येणा-या रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठीच्या निविदेमध्येही अटी व शर्ती स्पष्टपणे नमूद करण्यात येतात.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

धाराशिव बार्शी रोडवरील कौडगाव खानापूर येथील तक्रारीबाबत

(४८) १३३६१ (२५-०८-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव बार्शी रोडवरील मौजे कौडगाव व खानापूर येथील रस्त्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.अक्षय नाईकवाडी यांनी दिनांक ०३/०६/२०२५ रोजी जिल्हाधिकारी धाराशिव यांना लेखी तक्रार दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील तक्रारीमध्ये तक्रार दाराने माहितीच्या अधिकारात माहिती मागूनही त्यांना जाणीव पूर्वक माहिती दिली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खानापूर व कौडगाव येथील पुलाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असल्याने संबंधितास माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३०-०९-२०२५) : (१) होय, निवेदन प्राप्त आहे.
(२) हे खरे नाही.
दि.२३/०७/२०२५ रोजी अर्जदारास माहिती देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) खानापूर गावाजवळील पूलाचे बांधकाम निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कौडगावाजवळील पूलाचे Structural Audit केल्यानंतर पुलाचे काम पावसाळयानंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास कार्यकारी सहकारी संस्थेच्या मार्फत गडचिरोली जिल्ह्यात शेतकऱ्यांचे धान उत्पादकांचे पैसे प्रलंबित असल्याबाबत.

(४९) १४२३१ (१८-०८-२०२५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळ अंतर्गत आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांमार्फत गडचिरोली जिल्ह्यात खरीप हंगामात ८० केंद्रावरून धानाची विक्री केली असून हंगाम संपला तरी २०० शेतकऱ्यांचे जवळपास दीड कोटी रुपयांचे पैसे अद्याप प्रलंबित असल्याने धान उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरीप व रब्बी हंगामात आदिवासी विकास महामंडळ व मार्केटिंग फेडरेशनच्या वतीने धानाची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात असतानाही गडचिरोली जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे धान्याचे पैसे अद्याप त्यांच्या खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांचे वैयक्तीक कर्ज थकीत झाले असून आधीच शेतकऱ्यांना धानाचा योग्य मोबदला मिळाला नसल्याने धानावर अनेक रोग झाले असूनही शेतकरी धान पिकवून आधारभूत खरेदी केंद्रावर विक्री करतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आर्थिक संकटात सापडलेला धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रलंबित असलेले पैसे मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. छगन भुजबळ (३०-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.
गडचिरोली जिल्ह्यातील खरीप पणन हंगाम २०२४-२५ मधील सर्व प्रलंबित शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.
(२) व (३) या बाबत कोणतीही तक्रार शासनाकडे प्राप्त नाही.
(४) गडचिरोली जिल्ह्यातील खरीप पणन हंगाम २०२४-२५ मधील सर्व प्रलंबित शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवतनाही.

छत्रपती संभाजी नगरमधील विभागीय क्रीडा संकुलासाठी आलेल्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(५०) १५४६२ (०८-०९-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजी नगरमधील विभागीय क्रीडा संकुलासाठी आलेल्या निधीमधून दिशा फॅमिलीटीज कंपनी मार्फत कामास ठेवलेले श्री.हर्षकुमार अनिल व श्रीमती यशोदा शेट्टी या दोन लेखा लिपिकांनी क्रीडा विभागाच्या ईमेल आयडी मध्ये एका शब्दाचा बदल करून नवीन मेल आयडी बँकेला देऊन ११ महिन्यात २१ कोटी ५९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रक्कम मैत्रिणीच्या वैयक्तिक खात्यावर खात्यावर जमा करणे, महागड्या चार चाकी गाड्या खरेदी करणे, सोने इत्यादी मौल्यवान वस्तू खरेदी करणे, प्लॉट व फ्लॅट खरेदी करणे इत्यादी करीता वापरण्यात आल्याने तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरु असलेला तपास पुर्ण झाला आहे काय, त्या तपासात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

मे.दिशा फॅमिलीटीज कंपनी मार्फत कामास ठेवलेले कंत्राटी कर्मचारी नामे हर्षकुमार अनिल क्षिरसागर व यशोदा शेट्टी यांनी व इतरांनी विभागीय क्रीडा संकुल समितीची दिशाभुल करण्यासाठी शासकीय कार्यालयाचा अधिकृत ई-मेल आयाडी असतांना खोटा व बनावट ई-मेल आयडी तयार करुन विभागीय क्रीडा संकुल समितीचे बँक खात्याचे बँक स्टेटमेंट प्राप्त करुन त्या मुळ स्टेटमेंट मध्ये अपहाराच्या रक्कमेचे ट्रांन्जेक्शन कट करुन खरी माहिती लपविण्याच्या उद्देशाने त्याची प्रिंट विभागीय क्रीडा संकुल समितीस लेखा परिक्षणाच्या वेळेस सादर करुन समितीची दिशाभुल केली आहे.

विभागीय क्रीडा संकुल समितीच्या बँक खात्यास नेट बँकिंग सुविधा चालु करुन त्या नेट बँकिंग सुविधेकरिता स्वत:चा मोबाईल नंबर अपडेट करुन माहे जुन, २०२४ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत नेट बँकिंगद्वारे
रु. २१,५९,३८,२८७/- इतकी रक्कम स्वत:च्या नावे वळती करुन स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता शासकिय रक्कमेचा गैरव्यवहार व अपहार करुन शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, जवाहरनगर येथे गु.र.नं. ४२७/२०२४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे,

उपरोक्त प्रमाणे अपहाराच्या रक्कमेतुन आरोपींनी ५ चारचाकी गाडया, ३ दुचाकी खरेदी केल्या आहे, तसेच सदरच्या अपहाराच्या रक्कमेतुन फ्लॅट, गाळे, सोन्याचे दागीने, चांदीचे भांडे, मुर्त्या खरेदी केल्या आहेत. हे सर्व गुन्ह्याच्या तपासाकामी जप्त करण्यात आल्या आहे.

तसेच आरोपीकडुन रोख रक्कम रु. ३,५४,६३०/- इतकी जप्त करण्यात आली आहे. आरोपींच्या खात्यावरील रक्कम डेबीट फ्रिज करण्यात आली आहे. तसेच आरोपींनी सदरच्या अपहारातील काही रक्कम FD, Mutual Fund मध्ये गुंतवल्याचेही निदर्शनास आले आहे .

(३) होय, सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला असुन उपरोक्त प्रमाणे कारवाई करुन एकुण ११ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) विलंब नाही, गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द विहित मुदतीत दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

विधान भवन : **श्री. जितेंद्र भोळे**
नागपूर. **सचिव-१,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.